मुंबई - स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त, जनमित्र मंडळाने कांदिवली-पश्चिम येथील महावीर नगर येथील पावनधामजवळ वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात उत्तर मुंबईचे माजी खासदार गोपाळ शेट्टी, बोरिवली विधानसभा आमदार संजय उपाध्याय आणि उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष दीपक उर्फ बाळा तावडे यांनी वृक्षारोपण केले. याप्रसंगी, गोपाळ शेट्टी यांच्यासह, प्रभाग ३१ चे माजी नगरसेवक कमलेश राउत, माजी नगरसेवक प्रवीण शाह, शरद साटम, राजेश भट्ट, अमर मेहता, गणेश वारे, महेश राऊत, दीपक पाटणेकर आणि पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

एमएमआरडीएची निविदा प्रक्रिया योग्य असल्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सुप्रीम कोर्टाचीही मोहोर

एल अँड टीची विनंती सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ने गावमुख-भाईंदर या पाचामुद प्रकल्पासाठीची निविदा प्रक्रिया नव्याने राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामागे कायदेशीर स्थिती भक्कम असूनही, जनहित आणि सार्वजनिक निधीचा योग्य वापर हा प्रमुख हेतू आहे. या प्रकरणात एल अँड टी (L&T) कंपनीने दोन वेळा माननीय उच्च न्यायालयात निविदा प्रक्रियेविरोधात याचिका दाखल केली होती. दोन्ही वेळी न्यायालयाने एमएमआरडीएच्या बाजूने निर्णय देत निविदा प्रक्रिया पूर्णपणे तांत्रिकदृष्ट्या आणि कायदेशीरदृष्ट्या योग्य असल्याचे स्पष्ट केले.

यानंतर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान, एल अँड टीने असा दावा केला की त्यांच्या आर्थिक बोलीत सुमारे ₹३,००० कोटींचा फरक आहे. मात्र, एल अँड टीची बोली उघडण्यात आलेली नव्हती, कारण निविदेतील महत्वपूर्ण अट – बांधलेला कोणताही पूल दोन वर्षांत कोसळलेला नसल्याचे शपथपत्र – त्यांनी सादर केले नव्हते. वामुळे त्यांना अपात्र ठरवण्यात आले होते.

या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयात माननीय न्यायमूर्ती बी.आर. गवई यांनी स्पष्टपणे उच्च न्यायालयाचा निकाल रद्द करण्यासाठी एल अँड टीची विनंती फेटाळून लावली. त्यामुळे एमएमआरडीएची निविदा प्रक्रिया योग्य असल्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सुप्रीम कोर्टाचाही शिक्कामोर्तब झाले आहे, त्यामुळे उच्च न्यायालयाचा निकाल कायम राहिला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

'एमएसआरडीसी'कडून राज्यात सुरु असलेल्या कामांचा वेग वाढवा !

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सुरू असलेल्या विविध रस्ते विकास कामांचा वेग वाढवा, तसेच मुंबई-नाशिक महामार्गावरील शक्य तेवढी कामे मॉन्सूनआधी पूर्ण करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिले. एमएसआरडीसीच्या वतीने राज्यात सुरू असलेल्या राज्यातील विविध विकास प्रकल्पांचा त्यांनी आढावा घेतला. ही सर्व कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावीत अशी अपेक्षा उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. बैठकीस एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड आणि अधिकारी उपस्थित होते.

मुंबई - नाशिक महामार्गाचा आढावा घेऊन महामार्गावरील रखडलेल्या कामांना गती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री

श्री. शिंदे यांनी दिले. मॉन्सूनपूर्वी ज्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण पूर्ण होणार नाही त्याचे डांबरीकरण करून रस्ता वाहतूक करण्यास योग्य बनवावा, या मार्गावरील ३१ किलोमीटरचे काँक्रीटीकरण होणे अद्यापही बाकी आहे, तसेच पिंपळास चारोटी, रेल्वे ओव्हर ब्रिज येथील काम रखडले आहे या कामांना तत्काळ गती द्यावी, कंत्राटदार ही कामे वेळेत पूर्ण करण्यास हयगय करत असल्यास त्यालाही नोटीस पाठवून ताकीद द्यावी असेही शिंदे यांनी सांगितले. रेल्वे पुलाच्या कामासाठी गर्डर आल्यानंतर तत्काळ रेल्वेकडून मेगाब्लॉक मागून घ्यावा आणि हे काम येत्या महिन्याभरात पूर्ण करावे असेही सांगितले. या महामार्गावरील कशेळी येथील खाडीवरील पुलाचे काम ऑक्टोबरपर्यंत तर कळवा येथील खाडी पुलाचे काम जून महिन्याअखेर पूर्ण होणार आहे. येत्या पावसाळ्यात ठाणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक सुरळीत व्हावला हवी असे स्पष्ट निर्देश यावेळी दिले.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाची मिसिंग लिंक डिसेंबर अखेर होणार पूर्ण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंकच्या कामातील सर्वात अवघड असलेले वर्टिकल ब्रिजचे काम सध्या सुरू आहे. हे काम अत्यंत अवघड असल्याने ते नियोजनबद्धरित्या पूर्ण करावे असे त्यांनी सांगितले. तसेच हे काम येत्या डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण होणार असून त्यानंतर तो प्रवाशांसाठी खुला होईल. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता हा महामार्ग सहा ऐवजी दहा मार्गिकांचा करण्याचा प्रस्ताव एमएसआरडीसीच्या विचाराधीन असून विक एन्डला फिरावला जाणाऱ्या लोकांना दिलासा देण्यासाठी हे काम करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

कामात हयगय करणारे अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यावर कठोर कारवाई करणार

पुणे रिंगरोडच्या कामात बाधित होणाऱ्या 110 हजार झाडांचे पुनरोपण करणार पुणे रिंगरोडचे कामही सुरू झाले असून, यात एकूण १२ पॅकेजेस आहेत. यातील नऊ पॅकेजेसची कामे सुरू झाली आहेत. या रिंग रोडच्या कामात बाधित होणाऱ्या दहा हजार झाडांचे पुनरोपण होणार आहे. यातील चार हजार झाडांचे पुनरोपण यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे.

नवीन ऐक्सेस कंट्रोल रस्त्यामुळे कोकणचा कायापालट कोकणात सुरू असलेल्या रेवस रेड्डी सागरीमहामार्गावर नऊ ठिकाणी खाडीवर पूल उभारण्याचे काम सुरू आहे. यात रेवस-कारंजा, रेवदंडा, आगरदांडा, केळशी, काळबादेवी, दाभोळ, जयगड अशा खाडीपुलांचा समावेश आहे. यातील काही पुलांची कामे प्रगतीपथावर असून या कामांची गती वाढवावी असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच कोकणात प्रस्तावित असलेल्या कोकण द्रुतगती एक्सेस कंट्रोल महामार्गाचा कामाला गती देण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री यांनी दिल्या. या महामार्गामुळे मुंबई आणि सिंधुदुर्ग हे अधिक जवळ येतील तसेच कोकणात जलद पोहोचणे शक्य होईल.

कोकणातील निवारा केंद्राच्या कामात वेग वाढवावा कोकणात वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीवेळी गरजेच्या तात्पुरत्या निवाऱ्यांची सोय व्हावी यासाठी एमएसआरडीसीच्या वतीने ८६ निवारा केंद्रे उभारण्यात येणार होती. यातील ३७ निवारा केंद्राचे काम प्रगतीपथावर असून या कामाचा वेग देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले. तसेच शक्यतो शाळांच्या जवळ ही निवारा केंद्र उभारावीत जेणेकरून पावसाळ्यानंतर शाळांना त्यांचे उपक्रम राबवण्यासाठीही ही निवारा केंद्रे वापरता येतील असे सांगितले.

वन जमिनींवरील 80 हजार लोकवस्त्यांना मिळणार कायमचा दिलासा

खासगी वने 'संरक्षित जंगल' क्षेत्रातून वगळण्याचा दरेकरांचा ठराव जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या "खागजी वने" म्हणून संरक्षित केलेल्या वन जमिनी "संरक्षित वन" क्षेत्रातून वगळण्याबाबतचा प्रवीण दरेकरांनी मांडलेला ठराव आज जिल्हा नियोजन समितीमध्ये एकमताने मंजूर करण्यात आला. याबाबतचा पाठपुरावा केंद्र शासन, राज्य शासन व न्यायालयाकडे करण्यात येईल, असे आश्वासनही मुंबईचे पालकमंत्री अँडआशिष शेलार यांनी समिती सदस्यांना दिले.

आज मुंबई उपनगर जिल्ह्याची जिल्हा नियोजन समितीची बैठक बांद्रा येथे पार पडली. या बैठकीस बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, खासदार वर्षाताई गायकवाड, खासदार रविंद्र वायकर यांच्यासह मुंबई उपनगर जिल्ह्यातील आमदार, लोकप्रतिनिधी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

या बैठकीत आदिवासी उपयोजनांसाठी प्राप्त निधीचा अचूक आणि सुनियोजित वापर व आदिवासी पाड्यांमध्ये आवश्यक नागरी सुविधा या विषयावर चर्चा सुरु असताना संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अतिक्रित क्षेत्रात केतकी पाडा व आजुबाजूच्या परिसरातील सुमारे ८० हजार लोकवस्त्या 50 ते 60 वर्षांपासून आहेत. या वस्त्या झाल्यानंतर त्या जमिनींवर "खाजगी वने" असे आरक्षण टाकण्यात आले. त्यामुळे या वस्त्यांना लाईट, पाणी, रस्ता, स्वच्छतागृह अशा अत्यावश्यक सुविधा देता येत नाहीत. तसेच, या वस्त्यांचा पुनर्विकास देखील करता येत नाही. वारंवार न्यायालयांच्या आदेशामुळे येथील झोपडपट्ट्या निष्कासित करण्याची कारवाई केली जाते व त्यामुळे या नागरिकांना अतोनात त्रास सहन करावा लागतो. दरेकर यांनी अशीही मागणी केली की, हा प्रश्न कायमचा सोडविण्याकरिता वस्त्या अस्तित्वात असताना "खाजगी वने" म्हणून ज्या जमिनी संरक्षित केल्या गेल्या आहेत त्या जमिनी "संरक्षित वन" क्षेत्रातून वगळाव्यात. "संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अतिक्रित क्षेत्रात केतकी पाडा व आजूबाजूच्या परिसरातील 50 ते 60 वर्षांपासून असलेल्या "खाजगी वने" म्हणून संरक्षित केलेल्या जमिनी 'संरक्षित जंगल' क्षेत्रातून वगळण्यात याव्यात", असा ठरावही आमदार प्रविण दरेकर यांनी मांडला. बैठकीत लोकप्रतिनिधींनी एकमताने या ठरावाला पाठिंबा दिला व हा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. या ठरावाची अंमलबजावणी झाली तर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील "खागजी वने" म्हणून संरक्षित केलेल्या वन जमिनींवरील ८० हजार लोकवस्त्यांना कायमचा दिलासा मिळणार आहे. जिल्हा नियोजन समितीच्या अध्यक्षांनी असे आश्वासित केले की, आता या प्रश्नासंदर्भात राज्य शासन, केंद्र सरकार आणि न्यायालयात पुढील कार्यवाही करण्यात येईल.

पश्चिम रेल्वे

विविध कामे

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (रूफ्ल्यू), पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, अभि. इंग्रा., मुंबई सेंट्रल, मुंबई-४०००८ मागवीत आहेत. ई-निविदा सूचना क्र: बीसीटी/पी-२६/७४ दि. २६/०५/२०२५ मागविले आहेत.
काम आणि ठिकाण: चर्चगेट स्थानक– इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग सह हेलोजन आणि आऊट डोअर सिग्नलिंग गिअर्स बदलण्याच्या संबंधीत चर्चगेट स्थानक येथे आऊट डोअर सिग्नलिंग कामासह इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग सिस्टीमचा आंतरण, घुसवा, बसविणे, प्रोग्रामिंग, तपासणी, आणि कमिशनिंग करणे. (संकुल निविदा). अंदाजे कामाचे मूल्य: रु.१,५३,६१,९५०.३४ इंडो: रु.२,२६,८००/- निविदा सादरीकरणासाठी दिनांक आणि वेळ: २०.०६.२०२५ रोजी, १५.०० वाजता. निविदा उघडण्याचा दिनांक आणि वेळ: २०.०६.२०२५ रोजी १५:३० वाजता. अधिक तपशीलासाठी कृपया आमच्या (www.ireps.gov.in) ला भेट द्या.

०२००

अधिक माहिती साठी: facebook.com/WesternRly

भगतसिंग दोन 2 मधील नाल्याची साफसफाई करण्याची मागणी

मुंबई - मुंबईतील नाल्यांची अजूनही साफसफाई झालेली नसताना गोरेगावमधीलही काही नाल्यांमधील गाळ व कचरा काढण्यात आलेला नाही. गोरेगाव पश्चिम येथील भगतसिंग दोनच्या नालेसफाई व्यवस्थितरित्या न झाल्यामुळे काही गल्ल्यामध्ये पाणी जमा झाले आहे. गोरेगाव (पश्चिम), भगतसिंग नगर 2, राजाराम गल्ली येथील बाथरूमजवळील मोठा नाला जो भगतसिंग नगर 1 ला जोडतो त्या मोठ्या नाळ्याची सफाई झालेली नाही. त्यामुळे राजाराम गल्लीतसुद्धा पाणी जमा झाले आहे. लवकरात लवकर सदर नाल्यामध्ये गाळ व कचरा काढण्यात यावा, अशी मागणी स्थानिक रहिवाशी करत आहेत.

मध्य रेल्वे

शुद्धीपत्रक क्र. ३
निविदा क्र. सीआर-सीबी-टेंडर-सीआर-वीबी-टेंडर-२०२५-१९

निविदा क्र. सीआर-सीबी-टेंडर-सीआर-वीबी-टेंडर-२०२५-१९ करीता शुद्धिपत्रक क्र. २ यांची करण्यात आले आहे. निविदा रद्द करण्यात आली आहे. तपशिल www.ireps.gov.in वर पाहता येईल. सर्व अन्य अटी आणि शर्ती पूर्वीप्रमाणेच राहतील. सदर निविदा सार्वजनिक प्रयोग धोरण आदेश २०१७/दिनांकित १५/०६/२०१७ अनुसार मान्यताप्राप्त आहे.

डीआरएम (एस आणि टी) सीएसएमटी

Sign/1256

रेलचे फाटक की बंद स्थिति में पार करना मना है

मध्य रेल्वे

शुद्धीपत्रक क्र.१
निविदा क्र.
सीआर-सीबी-टेंडर-सीआर-सीबी-टेंडर-२०२५-१९

निविदा क्र. सीआर-सीबी-टेंडर-२०२५-१९ करिता शुद्धीपत्रक क्र. १ वरी करण्यात आले आहे.
निविदा समाप्ती दिनांक बदल १२/०६/२०२५ रोजी १५:०० वाजेपर्यंत वाढविण्यात आला आहे.
तपशील www.ireps.gov.in संकेतस्थळ पाहता येईल. अन्य सर्व अटी आणि शर्ती पूर्वीप्रमाणेच राहतील. सदर निविदा सार्वजनिक प्रायण धोरण आदेश २०१७/ दिनांकीत १५/०६/२०१७ अनुसार मान्यता प्राप्त आहे.

डीआरएम (एस आणि टी) सीएसएमटी

Sign/1255

रेलचे फाटक की बंद स्थिती में पार करना मना है

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
कार्यकारी अभियंता/ग-उत्तर विभाग यांचे कार्यालय,
सोनावाला इमारत शं. आ. पालव मार्ग, दादर मुंबई - ४०० ०१४.
म्हाडा MHADA

ई-निविदाक्र. का. अ./ग- उ. मु.इ. दु.व पु.मं./०१/२०२५ २०२६

Main Portal: https://mahatenders.gov.in,
MHADA Portal :https://mhada.gov.in

म्हाडाचा विभागीय घटक, कार्यकारी अभियंता (ग/उत्तर) विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, सोनावाला बिल्डींग, नं.८, शंकर आबाजी पालव मार्ग, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४ यांचेकडे १) मुंबई शहर जिल्हा अंतर्गत Deputy District Registar यांचेकडे उचित वर्गात नोंदणीकृत असलेल्या म्हाडा नोंदणीकृत पात्र मजुर सहकारी संस्थांकडून एकुण ०२ कामाकरीता बी-१ (Percentage Rate) समुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक निविदा विक्री आणि स्विकृती दि. ०२/०६/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता सुरु होऊन दि. १६/०६/२०२५ रोजी दुपारी ११.३० वाजता बंद होईल. तांत्रिक बोली उघडणे दि. १७/०६/२०२५ रोजी दुपारी ११.३० नंतर सुरु होईल.

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवले आहेत. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप: १ विस्तृत ई-निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिप: २ निविदा सुचनांनबाबत शुध्दिपत्रक/ बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर लावण्यात येतील.

CPRO/A/436

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us: @mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता / उत्तर विभाग मुंबई
इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६
कार्यालय : २७४५०४४/४१/१२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२३३३ Email : panvelcorporation@gmail.com

सूचना क्र : पमपा/ उद्यान /६५२५/प्र.क्र. २३/४०३/२०२५ दिनांक : ३०/०५/२०२५

अ. क्र	कामाचे नाव	वृक्षांचा तपशील	वृक्षांची नावे	नग	पिठावीचा आकार	झाडाची उंची
१.	पनवेल महानगरपालिका हद्दीत सन २०२५-२६ अंतर्गत विविध ठिकाणी वृक्ष लागवड करणेकामी वृक्षांचे दर मागविणेबाबत.	Minimum Girth 5 to 7 c.m. Minimum 5 to 6 Branches with Maximum number of Leaves, with clear tunk,healthy condition Free from pest and diseases, well seteled in appropriate size of Plybag,uniform in size and root system are undamaged.	प्रत्येकी १ नग	१३" X १३"	६ फूट ते ८ फूट

या कामाच्या जाहीर सुचनेबाबतची माहिती पनवेल महानगरपालिकेच्या https://www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. ३०/०५/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. संबंधित नोंदनीकृत नर्सरीधारक / पुरवठादार यांचे दर ग्राह्य धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२५/प्र.क्र.२३५/२३७/२०२५
दिनांक : ३०/०५ / २०२५
जा. क्र. पमपा/ उद्यान /६५२५/प्र.क्र.२४/४०४/२०२५
दिनांक : ३०/०५ / २०२५

Sd/-
(डॉ. वैभव विधाते)
उप आयुक्त (उद्यान)
पनवेल महानगरपालिका, पनवेल

म्हाडा छत्रपती संभाजीनगर मंडळातर्फे 53 अनिवासी भूखंडांचा ई-लिलाव नोंदणी व अर्ज प्रक्रिया 2 जूनपासून

प्रतिनिधी
■ मुंबई

म्हाडाच्या छत्रपती संभाजीनगर मंडळाच्या अक्षयवर्तीतील ५३ अनिवामी भूखंडांच्या विक्रीसाठी आयोजित करण्यात आलेल्या ई-लिलावासाठी ऑनलाईन नोंदणी व अर्ज प्रक्रियेला २ जून, २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपासून प्रारंभ होणार आहे, अशी माहिती मंडळाचे मुख्य अधिकारी शिवकुमार आवळकंठे यांनी दिली. ७ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत संगणकीय प्रणालीमध्ये पात्र ठरलेल्या अर्जदारांसाठी ऑनलाइन बोली स्वरूपातील ई-लिलाव www.eauction.mhada.gov.in या संकेतस्थळावर होणार आहे. दि. ८ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता https://mhada.gov.in व www.eauction.mhada.gov.in या दोन्ही संकेतस्थळावर ई-लिलावाचा एकत्रित निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

छत्रपती संभाजीनगर मंडळातील अनिवासी भूखंडांच्या ई-लिलावामार्फत विक्रीसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. सदर ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी www.eauction.mhada.gov.in संकेतस्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम ऑनलाईन भरणे यासाठी २ जून, २०२५ रोजी सकाळी ११वाजेपासून ते १ जुलै, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. ई-लिलावाकरिता आरटीजीएस, एनईएफटीद्वारे अनामत रकमेचा भरणा दि. २ जुलै, २०२५ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत करता येणार आहे. सदर लिलावाबाबत विस्तृत पात्रता निकष, प्रत्येक भूखंडाचे विवरण, भूखंडाचे आरक्षण व अर्ज करण्याची कार्यपद्धती, सविस्तर अटी व शर्ती, ऑनलाईन अर्ज सूचना, महितीपुस्तिका याबाबतची माहिती www.eauction.mhada.gov.in व mhada.gov.in या संकेतस्थळावरील Lottery>Eauction>eauction या पोर्टलवर उपलब्ध आहे.

8 जुलै रोजी एकत्रित निकाल

मध्य रेल्वे

गियर बॉक्ससाठी
स्पेअर्सच्या सप्लायची खेरदी

उप मुख्य सांहित्य व्यवस्थापक यांचे कार्यालय (सीडब्ल्यूई) सी आणि इंड्रा व्यापारी, माटुंगा, मुंबई – ४०००१९ निविदा क्र. ८/२५८५७३ मागविल आहेत. निविदा शीर्षक: बांद्रापात आलेल्या बोइंग ९ अनुसार मेधा बचावटीच्या ३५ बायी असलेल्या ट्रेन १८ निव्ह बॉक्सकरीता सर्वसंबंधित संच. परिमाण: ३२ संच. देय दिनांक: ०७/०७/२०२५. मूल्य: रु. ४२४३८१००.१६. निविदेचा पूर्ण तपशील मध्य रेल्वे अधिकृत संकेतस्थळ www.ireps.gov.in या उपलब्ध आहे. पूर्ण कागपत्रे संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील.

निविदा सूचना क्र. सीडब्ल्यूई/एमटीएन/८५२५५५७२/२०२५

रेलचे फाटक की बंद स्थिती में पार करना मना है

Sign/1341

आज शाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृह भायखळा (पूर्व), मुंबई । रात्री ८.00 ते ११.३०

महाराष्ट्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आयोजित **लोकरंग** महोत्सव २०२५
मुख्य प्रायोजक LIC
२५ वा महोत्सवी वर्ष
स्थापना : इ.स. २००१

विशेष उपस्थिती
मा. यशवंत जाधव - शिवसेना उपनेते व विधानसभा मा. यामिनी जाधव - मा. आमदार
मा. संतोष राणे - विधानसभा समन्वयक । मा. निखिल जाधव - मा. विनेट समिती सदस्य

विशेष आयोजन सहकार्य
ऊर्जा फाउंडेशन, मुंबई
संस्थापक, अध्यक्ष : विजय तिपारे
सरचिटणीस नितीन केरकर । खजिनदार अमन दळवी

शनिवार दि. ३१ मे २०२५

लावण्य जलसा
संकल्पना, दिग्दर्शन सायली परब
संगीत संयोजन सुनिल मेहेतर, राजू शेरवाडे
निवेदन पराग चौधरी
सोबत यामिनी रागा, हर्षदा राऊत आणि आकांक्षा कदम

PRINT MEDIA PARTNER Star बृहन्मुंबई THE PERFECT VOICE
मुंबई महानगरपालिका शाळा
सहाय्य मराठवाडा प्रतिष्ठान
MARATHA MARAWAD Culture
YouTube
तरुणी सेना
SHIVA SENA
SHAKTI MANCH
तुम्हाला मानाचा प्रतिनिधी दीप प्रज्वलन
LIVE ON
सामान्य मानाचा प्रायोजक
विशेष सहकार्य
by chaitanya arts

एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड
सीआयएन: एल२७१००एमएच१९८५पीएलसी०३५२६८
२८/३०, अनंत वाडी, बिनानी भवन, तळ मजला, भूलेश्वर, मुंबई ४००००२ ई-मेल : spvglobaltrading@gmail.com संकेतस्थळ: www. spvglobal.in

३१ मार्क २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि वर्षासाठी लेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा आराखडा
(रु. लाखामध्ये) ईपीएस वगळता

अनु. क्र.	तपशिल	एकमेव				एकत्रिकृत			
		संपलेले लेखापरीक्षित ३मासिक		संपलेले वर्ष	संपलेले वर्ष	संपलेले लेखापरीक्षित ३मासिक		संपलेले वर्ष	संपलेले वर्ष
		३१.०३.२०२५	३१.१२.२०२४	३१.०३.२०२४	३१.०३.२०२५	३१.०३.२०२५	३१.०३.२०२४	३१.०३.२०२५	३१.०३.२०२५
१	कार्यान्वित एकूण उत्पन्न (निव्वळ)	१२.२३	१.१९.७०	२.४०५.५०	४.६७३.०९	२१.११६.८०	९८.४१४.०१	११.१९२.३२	६१.३९८.७५
२	सामान्य कार्यान्वित कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (कर अपवादात्मक आणि किंवा अतिविशिष्ट बाबी पूर्व)	(४.९८)	१७.१७	(२.१३)	६४.३७	१.३४४.२५	१.०१४.४४	३.८२४.१३	१.२१६.३५
३	कर पूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि किंवा अतिविशिष्ट बाबी नंतर)	(४.९८)	१७.१७	(२.१३)	६४.३७	१.३४४.२५	१.०१४.४४	३.८२४.१३	१.२१६.३५
४	कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि किंवा अतिविशिष्ट बाबी पश्चात)	(३.४२)	१२.४३	(२.१३)	४८.०४	१.२५२.७७	७०७.३१	२.६५३.८३	१६०.०६
५	कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न (एकत्रित नफा/ तोटा)	(३.४२)	१२.८२	(२.३४)	४८.२१	१.२१०.०१	७०४.८२	२.६१९.१५	१६०.१८
६	समभाग भांडवल	१९६.००	१९६.००	१९६.००	१९६.००	१९६	१९६	१९६	१९६
७	कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न (एकत्रित नफा/ तोटा)		१२.८२	(२.३४)	४८.२१	-	-	१६,४३६.१४	१५,६७०.१६
८	प्रती समभाग उत्पन्न (अतिविशिष्ट बाबी नंतर) (प्रत्येकी रु. १०/- चे) (ए) मूळ (बी) सौम्यीकृत	(०.१९)*	०.६५*	(०.१९)	२.४५	३५.००*	९८.९१*	७४.२८	२५.१४

टिप : *यासंबंधीकरण केलेले नाही

उपरोक्त निष्कर्ष सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) २०१५ च्या अनुसार प्रसिद्ध करण्यात येत आहेत आणि लेखा परीक्षण समितीने समिक्षित केले आहेत आणि संचालक मंडळाने त्याच्या मे २९, २०२५ रोजी झालेल्या सभेमध्ये समत केले आहेत. संबंधानिक लेखा परीक्षकांनी वरील निष्कर्षाचे मर्यादित समीक्षण केले आहे. ३१ मार्च २०२५रोजी संपलेल्या वर्षासाठी आर्थिक निष्कर्षाचा पूर्ण आराखडा www.bseindia.com आणि www.spvglobal.in वर उपलब्ध आहे.

एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड करीता
सही/-
बाळकृष्ण बिनानी
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ००१७५०८०

ठिकाण: मुंबई
दिनांकित: २९ मे, २०२५